महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : चौथी

# व्याकरण

विद्यार्थ्यांच्या टप्प्यांमध्ये, शिकण्याच्या गतीमध्ये थोडाफार फरक असतो. तसेच काही घटकांची उजळणी दोन तीन वर्षे पुन:पुन्हा होणे दृढीकरणासाठी उपयोगी ठरते. हे लक्षात घेऊन व्याकरणातील काही घटकांविषयीचे तेच प्रश्न दोन किंवा तीन इयत्तांसाठी दिले आहेत.

**शब्दांच्या जाती**

**नाम**

गाळलेल्या जागा भर योग्य नाम घालून वाक्य पूर्ण कर.

१) गावाबाहेर एक पडका -------- होता.
२) ओबडधोबड ----- वरून त्याने हात फिरवला.
३) थंडगार ------ चा स्पर्श होताच आमचे अंग शहारले.
४) पायवाटेने अनवाणी चालताना टोकदार ---- लागल्यामुळे पायातून रक्त आले.
५) छपरावर चढलेल्या वेलीला गोल गरगरीत ----लागला होता.
६) विनयच्या खोलीत ----- चा ढीग लागला होता.
७) झाडाला लागलेले फिकट जांभळ्या फुलांचे ---- पाहून माझे मन प्रसन्न झाले
८) विस्तीर्ण पसरलेल्या ---- रंगीबेरंगी गवतफुले डोलत होती.
९) कोऱ्या करकरीत ---- वळणदार ---- लिहायला छान वाटते!
१०) आजीकडच्या कपबशीवर नाजूक ---- होती, ती मला फार आवडे.
११) रस्त्याने अगडबंब ----- जाताना मी पाहिला.
१२) लाकडी ---- कट्कन् मोडली.
१३) आमच्या गावात काल मुसळधार ---- पडला.
१४) आजीचे ---- अजूनही काळेभोर आहेत.
१५) पहाटे गाड्यांच्या ---- मला खडबडून जाग आली

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**सर्वनाम**

योग्य जागी सर्वनामे घालून परिच्छेद पुन्हा लिही

१) ताईने चहासाठी पातेले गॅसवर ठेवले. पातेल्यात चार कप पाणी घेतले. पाणी उकळू लागले. ताईने पातेल्यात साखर आणि चहा पावडर घातली. पातेले गरम होते म्हणून ताईने फडक्याने पातेले खाली उतरवले.

२) महागावगढीला यात्रेसाठी सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या सर्व गावातील लोक एकत्र येतात. यात्रेत लोक गाणी म्हणतात, नाचतात. यात्रेतच लोकांच्या मुलामुलींची लग्नसुद्धा ठरतात. लोक आनंदाने घरी जातात.

३) माझ्या भावाचे नाव रमेश आहे. रमेशला सगळे लाडोबा म्हणतात, कारण रमेश सगळ्यांचा लाडका आहे आणि लाडूसारखा गोल आहे. रमेशला अजून चालता येत नाही. रमेश रांगत चालतो.

४) मुले बसून अभ्यास करत होती. मुलांसमोर छतावरून पाल खाली पडली. मुलांचा वर्गात गोंधळ उडाला. मुलांनी पाल वर्गाबाहेर हाकलली. पुन्हा मुले अभ्यासात मग्न झाली.

**विशेषण**

गाळलेल्या जागा भर, रिकाम्या जागी योग्य ते विशेषण घाल.

१) वळणावर आंब्याची _____ झाडे होती.

२) _____ कागदावर गिरगटून अंगणवाडीच्या मुलांनी ते ताईंना दाखवले.

३) _____ फळ्यावर सरांनी _____ खडूने भराभर रेखाटने केली.

४) आजीच्या _____ हातावरून मामाने मायेने हात फिरवला.

५) _____ विहिरीत टाकलेल्या दगडाचा जरा वेळानंतर डुबुक आवाज आला.

६) आपल्या ____ आवाजात बेडकांनी ओरडायला सुरुवात केली.

७) ____आभाळात ____पक्ष्यांची जोडी संथपणे उडत गेली.

८) ____ विळीवर चिरताना अंबिकाचे बोट कापले.

९) छपरावर चढलेल्या वेलीला _____ भोपळे लागले होते.

१०) पारिजातकाच्या झाडाखाली _____ फुलांचा सडा पडला होता.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**क्रियापद**

संदर्भ लक्षात घेऊन योग्य क्रियापद घालून वाक्य पूर्ण कर.

१) आईने पीठ _____ आणि भाकरी _____.

२) पुरेसा पाऊस न झाल्यामुळे उभे पीक _____.

३) भूकंपामुळे समोरच्या उंच इमारती _____.

४) सुट्टीत आम्हाला काकांच्या घरी _____ बोलावले होते.

५) डोंगर _____ स्मिता पाय _____ पडली.

वाक्यांतील दोन्ही जागी कंसातील कोणतेही एकच क्रियापद लिहून वाक्य अर्थपूर्ण कर.

(चालाणे ,पडणे, लावणे, वाटणे, पडणे)

१) संजूने खाऊ सर्वांना _____ , त्यामुळे आईला बरे _____ .

२) पारुलने दार _____ आणि प्रशांतने दिवा ______ .

३) पाचचे टोले _____ , तेव्हा मुले वर्गाबाहेर _____ .

४) अंधार ______ , आमच्या अंगणात सौरदिव्याचा उजेड ______ .

५) रहिम काकांची रिक्षा दिवसभर ______ , त्यामुळे त्यांचे घर ______ .

**सामान्यरूप**

दिलेल्या शब्दाचे योग्य सामान्यरूप करून वाक्य पुन्हा लिही.

१) मामी स्टेशनवरून रिक्षा (ने) घरी आली.

२) आईने मासे (चे) कालवण केले.

३) मी कागद (वर) चित्र काढले.

४) जोराच्या वारा (ने) घरावरचे पत्रे उडाले.

५) उंच उडणाऱ्या पक्षी (ला) कसं वाटत असे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**विरामचिन्हे**

**पूर्णविराम**

योग्य ठिकाणी पूर्णविराम देऊन वाक्ये पुन्हा लिही

१) मीना सकाळी उठली तिने दात घासले आणि अंघोळ केली तिने भाकरी खाल्ली ती शाळेत गेली
२) सुरेशची बकरी हरवली तो घाबरला आणि रडायला लागला झाडामागून बकरीचा आवाज आला सुरेशला आनंद झाला
३) लाल सिग्नल लागला सायकल थांबली रिक्षा थांबली बस थांबली सिग्नल हिरवा झाला सगळे निघून गेले
४) घंटा वाजली मधली सुट्टी झाली मुलांनी ताटे घेतली ती ओळीत उभी राहिली ताईंनी खिचडी दिली मुलांनी खिचडी खाल्ली
५) आजीचा मोबाईल वाजला रजियाने मोबाईल तिला नेऊन दिला आजी काकांशी बोलली मोबाईल अचानक बंद झाला काकांनी पुन्हा फोन केला

**प्रश्नचिन्ह व पूर्णविराम**

योग्य त्या ठिकाणी प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही

१) दार वाजले कोण आले
२) किती वाजले शाळेची वेळ झाली का
३) बाजारात पोचलो कोणती भाजी घ्यायची भेंडी घ्यायची की वांगी
४) सारिका घसरून पडली तिला कोठे लागले फार दुखले का रक्त आले का
५) लग्नाला कोणाकोणाला नवीन कपडे करायचे आजच दुकानात जाऊ कोणत्या दुकानात जायचे
६) माझ्या दप्तरात वह्या पुस्तके कंपासपेटी पट्टी आणि रंगीत कागद आहेत

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**स्वल्पविराम व पूर्णविराम किंवा प्रश्नचिन्ह**

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम व प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही

१) आज घरी आजी आजोबा मामा मामी आणि मावशी आले

२) संजय चल बाजारात जाऊया

३) आंमच्या घरी पाच कोंबड्या सहा बकऱ्या आणि दोन बैल आहेत

**४)** ए आजी आज खीर करशील का

**स्वल्पविराम व अवतरणचिन्ह**

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम व अवतरणचिन्ह देऊन वाक्य पुन्हा लिही

१) मला दे ना तो पतंग वनिता म्हणाली

२) शाळा सुटली आता घरी पळा शिपाई काका म्हणाले मुले घरी पळाली

३) तू माझ्या घरी ये सपना विशालला म्हणाली

४) सुरेश म्हणाला आज बाजारात जायलाच हवे

५) आजीने सांगितले जखमेवर हळद लाव

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह व अवतरणचिन्ह**

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह व अवतरणचिन्ह देऊन वाक्य पुन्हा लिही

१) आज शाळेला सुट्टी का मावशीनी मुलांना विचारलं

२) झाडाला चिंचा बघ काय मस्त आल्यात अशोक म्हणाला

३) मंगलानी विचारलं तुला आवडली का मी लिहिलेली गोष्ट

४) बाबा आनंदाने म्हणाले अरे वा बाळानी आज पहिली दोन पावले टाकली आजचा वस लक्षात राहील

५) अरेरे वडाचं किती जुनं झाड तोडलं त्यांनी आजोबा उद्‌गारले त्यांच्या डोळ्यात पाणी आले

६) संगीता आई म्हणाली उठतेस ना सात वाजले

७) संतोष तुला आणखी भाकर देऊ आजीने विचारले की भात देऊ

८) ए चंदू ए सुमे अक्षय ओरडला येतोस ना खेळायला

९) जनाबाई जनाबाई आजीबाई सांगत आल्या तुझ्या बकरीनी करडू दिलं बघ

१०) एक पेरू तुला घे रंजना म्हणाली आणि एक मला दे चालेल